# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/12/2022 (गुरूवार) सायंकाळ


## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. देवलापार** :— अंतर्गत ३० मी. अंतरावरील मौजा पोलीस स्टेशन देवलापार एन. एच. ४४ रोड येथे दिनांक ०१/१२/२०२२ चे सकाळी ०४.३० वा. ते ०५.०० वा. दरम्यान मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग सा. हे पोलीस स्टेशन देवलापार येथील पोलीस पथक यांचेसह पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन देवलापार पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन महेंन्द्रा फुरीओ कंपनीचे वाहन क्र. एम. एच.—४०/सी. डी.—९८४२ चा चालक आरोपी नामे—१) जितेंन्द्र उर्फ सोनु राजू देशमुख, वय २१ वर्ष, रा. बिस्कान, ता. आमला जि. बैतुल मध्यप्रदेश, २) त्रिलोकचंद बालकिसन पाटीदार, वय ४२ वर्ष, रा. खापाखतेडा, ता. आमला, जि. बैतुल, मध्यप्रदेश, ३) नदीम आलमगीर कुरेशी, वय २१ वर्ष ४) समीर भाब्बीर कुरेशी, वय २० वर्ष, रा. दोन्ही रा. मोहल्लाटोला भामशाबाद ता. फतेहाबाद जि. आगरा उत्तरप्रदेश यांनी त्यांचे ताब्यातील वाहनात ०९ गायी, ०६ गोरे व ०४ बछडे गोवंश हे अतिशय आखूड दोराने एकावर एक रचून जनावरांची कोणीतीही बसण्याची व चारापाण्याची व्यवस्था न करता वाहतूक करतांना मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातुन असे एकुण १९ जिवंत गोवंश जप्त करून त्यांच्यावर पशू वैदयकीय उपचार करून व टॅगींग करून गोवंश गो. अनुसंधान केंद्र, देवलापार येथे जमा करण्यात आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— पोलीस नाईक संदीप नागोसे, बं. नं. १९७४ पोलीस स्टेशन देवलापार यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम कलम ११ (१) (घ,) ड) (च) प्रा. छ. अधि. सहकलम ५ (अ) ९ म. प्रा. स. का. सहकलम ३४ भादवी. सहकलम १८४, १७९ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक केशव पुंजरवाड, पोलीस स्टेशन देवलापार, मो. क्र. ८६६८८६५२०३ हे करीत आहे.




## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा डिमविला लॉज नयाकुंड येथे दिनांक २९/११/२०२२ चे २२.०० वा. ते दिनांक ३०/११/२०२२ चे सकाळी ०९.०० वा. यातील **मृतक नामे– दिनेश रामाजी अनरकर, वय ५७ वर्ष, रा. खेडी परसोडी ता. मौदा जि. नागपुर** याने डिमविला लॉज येथे भाडयाने रूम घेतली असुन वरील घटना वेळी व ठिकाणी यातील मृतक याने वेगवेगळया लोकांकडुन पैसे घेतलेले असुन लोकांना पैसे परत दयावे लागतील या कारणावरून टेंशन घेवुन डिमविला लॉज मधील भाडयाने घेतलेल्या खोलीत सिलींग पंख्याला दुपट्टयाने गळफास लावुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुरेद्र मुलचंद पटले, वय ४८ वर्ष, ह. मु. बीडगाव पारडी नागपूर ह.मु डिमविला लॉज नयाकुंड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार देवानंद बोद्रे, ब. नं ११४२ पोलीस स्टेशन पारशिवनी मो. क्र. ७३५००७१९४१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर